**<u>पुढील सरतपास फिर्यादीतर्फे विधीज्ञ श्री.जी.जी.टांककर यांचे मार्फत शपथेवर</u>**

८.        (फिर्यादीच्या वकिलांनी साक्षीदारास निशाणी ४ /४ कडील नोटीसीची स्थळप्रत दाखविली.) आता मला दाखविण्यात आलेली नोटीसची स्थळप्रत तिच आहे. त्यावर माझ्या वकिलांची सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. (सदर नोटीसीच्या स्थळप्रतीस **<u>निशाणी २१</u>** देण्यात येते.) (फिर्यादीच्या वकिलांनी साक्षीदारास निशाणी ४ /४ कडील पोस्टाची पावती दाखविली.) सदर पावतीवर आर.एम.५४१८४१५११आय.एन. असा नंबर नमूद आहे. त्यावर आरोपीचे नाव नमूद आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. (सदर पोस्टाच्या पावतीस **<u>निशाणी २२</u>** देण्यात येते.) (फिर्यादीच्या वकिलांनी साक्षीदारास निशाणी ४/५ कडील पोस्टाची पोहोच पावती दाखविली.) सदर पावतीवर आरोपीची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. (सदर पोस्टाच्या पोहोच पावतीस **<u>निशाणी २३</u>** देण्यात येते.) (फिर्यादीच्या वकिलांनी साक्षीदारास निशाणी ४ /६ कडील ट्रॅक कन्साईन्मेट लेटर दाखविले.) आता मला दाखविण्यात आलेले ट्रॅक कन्साईन्मेट लेटर तेच आहे. त्यावर डाकपाल वेंगुर्ला यांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. (सदर लेटरला **<u>निशाणी २४</u>** देण्यात येते.) (फिर्यादीच्या वकिलांनी साक्षीदारास निशाणी १२ /१ कडील आरोपी व फिर्यादी यांच्यामध्ये झालेला दि.२०/०२/२०१५ रोजीचे करारपत्र दाखविले.) आता मला दाखविण्यात आलेले करारपत्र हे तेच असून ते १००/- च्या स्टॅम्पपेपरवर केलेले आहे. त्यावर माझी लिहून घेणार व आरोपीची लिहून देणार म्हणून सही आहे. त्यावर साक्षीदार म्हणून सौ. तेजस्वी जयवंत पालव यांची सही आहे. ती मी ओळखतो. त्यांनी सही माझ्यासमक्ष केली होती. त्यावर साक्षीदार म्हणून माझी आई पद्मजा गोपाळकृष्ण रावळ यांची सही आहे. त्यांनी सही माझ्यासमक्ष केली होती. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदर करारपत्रातील मजकूर हा माझ्या व आरोपीच्या संमतीने लिहिला गेला होता . आरोपीला सदरचा मजकूर मान्य होता. मी व आरोपींनी साक्षीदारांच्यासमक्ष करारपत्रावर सही केली. साक्षीदारांनी माझ्या व आरोपीच्यासमक्ष सह्या केल्या. (सदर करारापत्रास **<u>निशाणी २५</u>** देण्यात येते.) (फिर्यादीच्या

वकिलांनी साक्षीदारास निशाणी १२/२ कडील धनादेश परतीचा मेमो दाखविला.) आता मला दाखविण्यात आलेला मेमो तोच आहे. त्यावर बॅंकेचे सिल व अधिकाऱ्याची सही आहे. त्यावर अनुक्रमांक १७ च्या कॉलममध्ये fund insufficent असा शेरा आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. (सदर मेमोस **निशाणी २६** देण्यात येते.) (फिर्यादीच्या वकिलांनी साक्षीदारास निशाणी २०/१ कडील धनादेश दाखविला.) आता मला दाखविण्यात आलेला धनादेश तोच आहे जो आरोपीने मला दिला होता. त्यावर आरोपीची सही आहे. आरोपीने माझ्यासमक्ष सही केली होती. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदरचा धनादेश क्र.०२०७१४ हा रक्कम रुपये ३,८०,०००/- चा असून तो दि. २९/०६/२०२० रोजीचा आहे. (धनादेशास **निशाणी २७** देण्यात येते.)

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.पी.डी.नाईक यांचे मार्फत.**

(आरोपीच्या निशाणी २८ वरील अर्जावरील आदेशाप्रमाणे उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.)

**श्रवणोत्तर स्विकृत,**

सही/-

दिनांक- ०६/०७/२०२२.

(के.के.पाटील)
न्यायदंडाधिकारी वर्ग १, वेंगुर्ला.